**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**बुधवार दिनांक १७ सप्टेंबर २०२५**

**ठळक बातम्या**

1. **पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते 'स्वस्थ नारी, सशक्त परिवार अभियान आणि ८व्या राष्ट्रीय पोषण मासाचा प्रारंभ.**
2. **पंतप्रधान मोदींच्या वाढदिवसानिमित्त अश्विनी वैष्णव यांनी दूरदर्शनवर 'सेवा पर्व' कार्यक्रम केले सुरू.**
3. **'मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियाना' चा किनगाव येथे राज्यस्तरीय शुभारंभ, १ कोटी लाडक्या बहिणींना लखपती दीदी बनवणार - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस.**
4. **गडचिरोली जिल्ह्यातील एटापल्ली तालुक्यातील चकमकीत दोन नक्षली महिलांचा खात्मा.**

**-----------------------------------------------**

स्वस्थ नारी, सशक्त परिवार

नारीशक्ती हा देशाच्या प्रगतीचा मुख्य आधार असल्याचं प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आज केलं. मध्य प्रदेशच्या धार जिल्ह्यात आज त्यांच्या हस्ते ‘स्वस्थ नारी, सशक्त परिवार’ अभियान आणि ८ व्या राष्ट्रीय पोषणमासाचा प्रारंभ झाला,त्यावेळी ते बोलत होते. हे दोन्ही उपक्रम आजपासून दोन ऑक्टोबरपर्यंत सुरू राहणार आहेत. याअंतर्गत सर्व महिलांना मोफत वैद्यकीय तपासणीची सुविधा आणि औषधं मिळणार आहेत. मध्य प्रदेशात आदि सेवा पर्व आणि देशातल्या पहिल्या पीएम मित्र पार्कची पायाभरणीही पंतप्रधानांच्या हस्ते झाली. आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्रालयामार्फत ‘स्वस्थ नारी, सशक्त परिवार’ या विशेष राष्ट्रीय अभियानाला आज इंदूर इथं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते सुरूवात झाली. नारीशक्ती विकसित भारताच्या ४ स्तंभांपैकी एक असल्याचं ते यावेळी म्हणाले-

***(होल्ड बाईट - पंतप्रधान नरेंद्र मोदी २७ सेकंद)***

***एक सौ चालीस करोड़ लोगों ने विकसित भारत बनाने का संकल्प लिया है और विकसित भारत की इस यात्रा के चार सबसे प्रमुख स्तंभ हैं भारत की नारी शक्ति,***

***युवा शक्ति, गरीब और किसान आज यहाँ इस कार्यक्रम में विकसित भारत के इन चारों स्तंभों को नई मजबूती देने का काम हुआ है।***

मुंबईच्या यशवंतराव चव्हाण केंद्रातून केंद्रीय आरोग्य आणि कुटुंब कल्याण राज्यमंत्री प्रतापराव जाधव, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस बीडमधून, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे या कार्यक्रमात दूरदृश्यप्रणालीद्वारे सहभागी झाले होते. दोन ऑक्टोबरपर्यंत चालणाऱ्या या अभियानात सर्व महिला आणि बालकांनी सहभागी होण्याचं आवाहन प्रशासनातर्फे करण्यात आलं आहे.

---------------------------------------------

सेवा आणि सुशासन

सेवा आणि सुशासन या तत्त्वांचं अनुसरण करीत केंद्र सरकारनं गेल्या ११ वर्षांत देशाच्या सर्वांगीण प्रगतीचा आलेख उंचावला आहे. या प्रगतीत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाचा सिंहाचा वाटा आहे. मोदी यांचा जागतिक पातळीवरचं प्रभावशाली व्यक्तिमत्व बनण्याचा प्रवास असाधारण आहे. विविध क्षेत्रातल्या मान्यवरांनी त्यांच्या नेतृत्वाविषयी गौरवोद्गार काढले आहेत. केंद्रीय माहिती आणि प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव यांनी पंतप्रधान मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित रक्तदान शिबिरात रक्तदान केलं. पंतप्रधान मोदी यांच्याविषयी गौरवोद्गार काढताना ते म्हणाले....

***(होल्ड बाईट - केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव २५ सेकंद)***

***आज दूरदर्शन से प्रसार भारती से जो डॉक्यूमेंट्री तीन रिलीज हुई है, उसमें वही भावना वही कर्म योग झलकता है किस तरह से प्रधानमंत्री जी ने अपने जीवन की शुरुआत से अपना सर्वस्व त्याग कर, स्व को भुलाकर समाज के लिए, देश के लिए, राष्ट्र निर्माण के इस यज्ञ में काम करने के लिए, जो एक संकल्प लिया वो हम सबके लिए सौभाग्य की बात है.***

दरम्यान, अश्विनी वैष्णव यांनी आज नवी दिल्ली येथे एका कार्यक्रमात सेवा पर्वाच्या प्रसंगी डीडी नॅशनल आणि डीडी न्यूजसाठी कार्यक्रमांची एक विशेष मालिका सुरू केली. याप्रसंगी, माहिती आणि प्रसारण सचिव संजय जाजू म्हणाले की, देशभरातून बदल, परिवर्तन आणि राष्ट्र उभारणीबद्दल कथा येत आहेत. या कार्यक्रमांच्या मालिकेचा भाग म्हणून, तीन माहितीपट आणि एक विशेष शो लाँच करण्यात आला. याव्यतिरिक्त, राज्य-आधारित वृत्तवाहिन्यांसाठी प्रादेशिक भाषांमधील अनेक माहितीपट देखील तयार केले गेले आहेत, जे दूरदर्शनच्या प्रादेशिक केंद्रांद्वारे प्रसारित केले जातील. पंतप्रधान मोदी यांच्या शालेय जीवनावर आधारित ‘चलो जीते

है' या चित्रपटाचं प्रदर्शनही देशभरात शालेय विद्यार्थ्यांकरिता करण्यात येत असून नागपूरमध्ये आयनॉक्स तुली मॉल येथे 17 ते 24 सप्टेंबर दरम्यान संध्याकाळी साडेसहा वाजता या चित्रपटाचे प्रदर्शन होणार आहे.

---------------------------------------------

जीएसटी

नव्या जीएसटी सुधारणांमुळे देशाच्या अर्थव्यवस्थेत सुमारे २ लाख कोटी रुपयांची गुंतवणूक होईल, असं केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी म्हटलं आहे. त्या आज विशाखापट्टणम इथं जीएसटी सुधारणांबाबत आयोजित कार्यक्रमात बोलत होत्या. या सुधारणांमुळे कर भरण्यात खर्च होणाऱ्या सामान्य लोकांच्या पैशांची बचत होईल, असंही त्या म्हणाल्या. नव्या सुधारणांमुळे २०२५ या वर्षात जीएसटी संकलनात वाढ होऊन ते २२ लाख कोटी रुपयांहून अधिक असेल, असं त्यांनी सांगितलं.

---------------------------------------------

ओला दुष्काळ

राज्यात ऑगस्ट आणि सप्टेंबर महिन्यात झालेल्या अतिवृष्टीनं तब्बल ३० जिल्ह्यात नुकसान झालं आहे. राज्यातील १७ लाख ८५ हजार ७१४ हेक्टर क्षेत्र पावसानं बाधित झालं आहे. आधीच शेतकऱ्यांची कर्जमाफी झाली नाही, त्यात शेतातील पीक देखील हातातून गेलं आहे. त्यामुळे बळीराजा अडचणीत आला आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना राज्य सरकारनं तातडीनं मदत करावी, अशी मागणी काँग्रेस विधिमंडळ नेते विजय वडेट्टीवार यांनी केली आहे.

---------------------------------------------

लखपती दीदी

प्रत्येक गावात जिल्हा बँकेमार्फत लाडक्या बहिणींना बिनव्याजी एक लाख रुपयांचं कर्ज देऊन त्यांना शासन आर्थिक पाठबळ देईल. त्यातून उद्योग व्यवसाय करून त्या स्वावलंबी होतील. राज्यातील एक कोटी लाडक्या बहिणींना लखपती दीदी करण्याचा संकल्प असल्याचा निर्धार मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला. महाराष्ट्र शासनाच्या महत्त्वाकांक्षी 'मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियाना' चा राज्यस्तरीय शुभारंभ मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील किनगाव फुलंब्री इथं झाला. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा वाढदिवस आणि मराठवाडा मुक्तिसंग्राम दिनाचं औचित्य साधून या कार्यक्रमाचं आयोजन करण्यात आलं. राज्यातील सर्व ग्रामपंचायतींमध्ये दि.१७ सप्टेंबर ते ३१ डिसेंबर या

कालावधीत 'मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान' राबविलं जाणार आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त 'सेवा पंधरवडा' राबविण्यात येत आहे, त्यासाठी मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान सुरू करण्यात आलं आहे. पंतप्रधानांच्या नेतृत्वात देशानं प्रगती केली असून २५ कोटी लोक गरिबी रेषेखालून वर आले आहेत. आज १५ कोटी लोकांना स्वतःचं घर उपलब्ध होऊ शकलं. लोकांच्या जीवनात परिवर्तन आलं. हे सगळे पंतप्रधान मोदी यांच्या नेतृत्वात घडलं, असं मुख्यमंत्री म्हणाले.

-----------------------------------------------

नक्षली महिला

गडचिरोली जिल्ह्यातील एटापल्ली तालुक्यातील गट्टा-जांभिया पोलिस ठाण्यांतर्गत मोडस्के जंगलात आज दुपारी झालेल्या चकमकीत पोलिसांनी दोन नक्षली महिलांना कंठस्नान घातले. घटनास्थळावरुन पोलिसांनी स्वयंचलित रायफलीसह मोठ्या प्रमाणावर दारूगोळा ताब्यात घेतला आहे. मोडस्के जंगलात गट्टा दलमचे काही नक्षली दबा धरून बसल्याची माहिती मिळाल्यानंतर अहेरी येथील प्राणहिता पोलिस उपमुख्यालयाचे अपर पोलिस अधीक्षक सत्यसाई कार्तिक यांच्या नेतृत्वात पोलिसांच्या सी-६० दलाची पाच पथके त्या परिसरात नक्षलविरोधी अभियानावर रवाना करण्यात आले होते. शिवाय गट्टा पोलिस ठाण्यातील पोलिस आणि केंद्रीय राखीव दलाच्या १९१ बटालियनच्या पोलिसांनी बाहेरुन नक्षल्यांना घेराबंदी केली. अभियान सुरु असताना नक्षल्यांनी पोलिसांवर गोळीबार केला. पोलिसांनीही जोरदार प्रत्युतर दिले. चकमकीनंतर पोलिसांनी घटनास्थळाची पाहणी केली असता २ नक्षल महिलांचे मृतदेह आढळून आले.

-----------------------------------------------

संयुक्त किसान मोर्चा

शेतकऱ्यांच्या आत्महत्यांचं केंद्र असलेल्या विदर्भात शेतकऱ्यांचे प्रश्न केंद्रस्थानी आणून निर्णायक लढा उभारण्यासाठी संयुक्त किसान मोर्चाचे नेते विदर्भ दौरा करत असून महात्मा गांधींच्या सेवाग्राम इथून या दौऱ्याची आज सुरुवात करण्यात आली. शेतकरी नेते राकेश टिकैत, डॉ. अशोक ढवळे, विजू कृष्णन इत्यादी 23 राष्ट्रीय नेत्यांच्या नेतृत्वाखाली होत असलेला हा दौरा तीन दिवसांचा असणार आहे. पंजाब, हरियाणा, झारखंड, केरळ, तेलंगणा आदी राज्यांसह महाराष्ट्रातून या दौऱ्यात शेतकरी नेते सहभागी झाले आहेत. विदर्भातील शेतकरी आत्महत्याग्रस्त कुटुंबांशी संवाद, गावोगावी शेतकऱ्यांशी संवाद, कापूस उत्पादक शेतकऱ्यांच्या भेटी, पत्रकार परिषदा,

शेती अभ्यासकांशी चर्चा आणि वर्धा, अमरावती आणि अकोला इथं जाहीर सभा असं या दौऱ्याचं स्वरूप असणार आहे. दौऱ्याच्या सुरुवातीला शिष्टमंडळानं नागापूर या गावी शेतकरी आत्महत्याग्रस्त कुटुंबाला भेट दिली आणि ग्रामस्थांशी संवाद साधला. वर्ध्यात या दौऱ्याची पहिली सभा सत्यनारायण वाचनालय सभागृहात संपन्न झाली.

-----------------------------------------------

स्वच्छता ही सेवा

केंद्र शासनाच्या ‘स्वच्छ भारत मिशन’द्वारे १७ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर या पंधरवडा कालावधीत ‘स्वच्छता ही सेवा 2025’ हे अभियान राबविण्याचं जाहीर करण्यात आलं आहे. 'स्वच्छोत्सव' या संकल्पनेनुसार नागपूर महानगरपालिकेद्वारा 'स्वच्छता ही सेवा २०२५' या अभियानाचा शुभारंभ आज मनपा आयुक्त तथा प्रशासक डॉ. अभिजीत चौधरी यांच्या हस्ते करण्यात आला. महानियंत्रक कार्यालय आणि मध्य रेल्वे इथेही हे अभियान राबविण्यात येत आहे. मनपा मुख्यालयातील छत्रपती शिवाजी महाराज प्रशासकीय इमारतीच्या दालनात आयोजित छोटेखानी समारंभात अभियानाचा भाग असलेल्या '७२ तास स्वच्छता' उपक्रमाला मनपा आयुक्तांच्या हस्ते हिरवी झेंडी दाखवून सुरुवात करण्यात आली. याप्रसंगी मनपाच्या घनकचरा व्यवस्थापन विभागाचे उपायुक्त राजेश भगत यांच्यासह स्वच्छता विभागाचे अधिकारी - कर्मचारी मोठ्या संख्येनं उपस्थित होते.

-----------------------------------------------

महा मेट्रो

महा मेट्रो नागपूरच्या वतीनं महा कार्डसाठी लागू असणाऱ्या शुल्कावर १००% सूट देण्याचा निर्णय १५ सप्टेंबर पर्यंत देण्यात आला होता, याला आता ३० सप्टेंबरपर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. केवळ रु. 200 चा टॉप-अप करून आपण हे महा कार्ड मोफत मिळवू शकता. हे कार्ड पदवीपर्यंतचं शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध आहे.

-----------------------------------------------

हवामान

हवामान! पुढील एका तासांमध्ये नागपूर, यवतमाळ, वाशिम, अमरावती आणि वर्धा जिल्ह्यात तुरळक ठिकाणी मध्यम स्वरूपाचा पाऊस येण्याची शक्यता आहे. अकोला चंद्रपूर गडचिरोली येथे हलक्या स्वरूपाच्या पावसाची शक्यता आहे. पुढील दोन

दिवस संपूर्ण विदर्भात हलक्या ते मध्यम पावसाचा येलो अलर्ट घोषित करण्यात आला आहे.

-------------------------------------------------